# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०५/२०२६ (गुरूवार )

## (Carpool) कारपुल म्हणजे सामुहीक वाहन प्रवास उपक्रम राबवुन इंधन बचतीसाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा अभिनव पुढाकार

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामार्फत इंधन बचत, पर्यावरण संवर्धन व शासकीय संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर करण्याच्या उद्देशाने **“कार पुल उपक्रम”** सुरू करण्यात आला आहे.

**सदर उपक्रमाच्या अनुषंगाने नागपुर ग्रामीण जिल्हयातील प्रत्येक पोलीस स्टेशन मधुन कर्तव्याकरिता बाहेरगावावरून दररोज ये—जा करणारे पोलीस अधिकारी अंमलदार यांची माहीती मागविण्यात आली. प्राप्त माहितीनुसार ग्रामीण भागातील अनेक पोलीस अधिकारी व अंमलदार हे त्यांच्या कार्यक्षेत्रापासून लांब अंतरावरून कर्तव्याकरीता दररोज स्वतंत्रपणे दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने ये—जा करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर इंधनाचा वापर होतो. या उपक्रमांतर्गत सर्व पोलीस स्टेशन मधील एकाच मार्गावर ये—जा करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी स्वतंत्र वाहने वापरण्याऐवजी एकाच चारचाकी वाहनातून सामूहिक प्रवास करणे तसेच दुचाकीवरही सहप्रवासाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. एका चारचाकी मध्ये ४ सहप्रवासी तसेच एका दुचाकी वर सहप्रवाशाला सोबत न्यावे असे मा. पोलीस अधीक्षकांनी आदेशीत केले आहे. तसेच मा. पोलीस अधीक्षक यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दौऱ्यांदरम्यान अनावश्यक पायलट वाहनांचा वापर टाळण्याच्या तसेच अत्यावश्यक परिस्थिती वगळता पायलट वाहनांचा वापर न करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे इंधन बचत, पर्यावरण संवर्धन व शासकीय संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर होण्यास मदत होणार आहे.**

# पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) च्या गुन्हयातील अवैध रेती तस्कर टोळीतील पाहीजे आरोपीला अटक, ७ दिवस पोलीस कोठडी मंजुर,भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर येथे बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करून शासनाचा महसुल बडवुन फसवणुक करणारा टोळी प्रमुख तसेच ८ टोळी सदस्य अशा एकुण ९ आरोपीतांविरुद्ध **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी** टोळीप्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर व टोळी सदस्य आणि ८ सदस्य यांच्यावर कलम ३०३ (२), ३१८(४),३३६(३),४९,३(५) भा न्या सं सहकलम ४८ (७) ४८ (८) महा जमीन महसुल संहित १९६६ सह ४, २१ खान व खनीज अधीनियम १९५७ सह कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रती अधी १९८४ सह १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम सह कलम ३ महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये गुन्हा नोंद आहे. सदर गुन्हयात पोलीसांनी टोळीप्रमुख नामे १) मोहम्मद ईनाजूल उर्फ कल्लू तजमुल खॉन,वय ४० वर्ष,रा. रोशनबाग खरबी चौक,नागपूर वटोळी सदस्य २) कैसर अली रियाजुददीन अली,वय ४७ वर्ष,रा. गरीब नवाज चौक, खरबी, नागपूर ३) सुरज दिलीप गभने, वय २७ वर्षे, रा.गुडेगाव, पो.सावरला, ता.पवनी जि. भंडारा, ४) दिनेश मधूकर काकडे, रा. डोंगरगाव ता. कुही जि. नागपूर आणि आरोपी क्रं ५) शैलेंद्र कवडु वैद्य, वय ३५ वर्षे, रा. पाचगाव वार्ड क्रमांक दोन वोडाफोन टॉवरच्या बाजूला तालुका उमरेड जिल्हा नागपूर यांना यापुर्वी अटक केलेले आहे.

**दिनांक १२/०५/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्हयात पाहीजे आरोपी नामे अमोल देवराव पाटील वय ३६ वर्षे, रा पाचगाव, ता. उमरेड जि.नागपूर याला पाचगाव येथुन ताब्यात घेवुन अटक केले आहे. नमुद आरोपीचा दिनांक १९/०५/२०२६ रोजी पर्यंत एकुण ७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**



**आरोपी अमोल देवराव पाटील**

## मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघड, ७ मोटर सायकल जप्त ३ लाख ३५ हजारांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेल्या गुन्हयांचा तपासकामी पेट्रोलींग करीत असता दिनांक १४/०५/२०२६ रोजी मौजा महालगाव बसस्टॉप जवळ उभे राहून संशयीत वाहनांना चेक करित असता नागपूर कडून भंडारा दिशेने एक संशयित मोटरसायकल येतांना दिसली असता चालकास थांबवुन त्यास मोटरसायकलचे कागदपत्राबाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला तेव्हा त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **राहूल सुखचंद ठाकरे, वय ४३ वर्ष, रा. प्लॉट नं. ९५५, मिनीमाता नगर शिवमंदीर जवळ, गल्ली नं. ०१ नागपूर.** असे सांगीतले व सदर मोटरसायकल बाबत विचारले असता समाधानकारक उत्तर न दिल्याने सदर वाहनाचे क्रंमाकावरून नागपूर जिल्हयातील वाहन चोरीचे अभिलेखावरील गुन्हयाची पाहणी केली असता सदर मोटरसायकल ही फिर्यादी नामे सुरेन्द्र

युवराज बिसेन, वय ४५ वर्ष, रा. एरीकेशन कॉलनी गुमथळा, ता. कामठी यांनी दिनांक १८/०३/२०२६ रोजी नेहमी प्रमाणे रात्री होंडा शाईन क्र. एम एच–४०/बि एक्स–५४४३ ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीने दिलेल्या रिपोर्ट वरून पो.स्टे. वडोदा येथे अप.कं. १९/२६ कलम ३०३ (२) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे. नमुद आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता त्याने नागपुर शहर, नागपुर ग्रामीण तसेच मध्यप्रदेश राज्यातुन मोटार सायकल चोरी केली तसेच चोरीच्या सर्व मोटरसायकल त्याने विक्री करण्याचे उद्देशाने वेगवेगळया ठिकाणी लपवुन ठेवलेल्या असल्याचे सांगीतले.

**पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया ठिकाणाहुन चोरीस गेलेल्या मोटर सायकल क्रं १) एम एच–४०बी एक्स ५४४३ २) विना क्रमांकाची स्प्लेंडर प्रो ३) विना क्रमांकाची स्प्लेंडर प्लस ४) विना क्रमांकाची होंडा शाईन ५) विना क्रमांकाची स्प्लेंडर प्लस ६) विना क्रमांकाची स्प्लेंडर प्लस ७) विना क्रमांकाची होंडा शाईन असा एकुण ३,३५०००/–रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१) पो.स्टे. वडोदा अप.क. १९/२६ कलम ३०३(२) भान्यासं

२) पो.स्टे. अजनी अप.क. ०२/२४ कलम ३०३(२) भान्यासं

३) पो.स्टे. यशोधरा नगर अप.क. ३३५/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

तसेच इतर ४ गुन्हे मध्यप्रदेश राज्य येथे नोंद आहे.



**गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १० गोवंश जनावरांची सुटका, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदा:— दिनांक १४/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची वाहतुक केली जाणार आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी पोलीस स्टेशन वडोदा हद्दीतील मौजा झुल्लर फाटा येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत पिकअप वाहन **क्रमांक एम एच ३६.ए ए ४१६३** हे वाहन मिळुन आले. पोलीसांना पाहुन सदर वाहन चालक त्याचे वाहन सोडून पळुन गेला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १० गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करत अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप वाहन **क्रमांक एम एच ३६.ए ए ४१६३**

किंमती ४,००,०००/— रूपये आणि १० गोवंश जनावरे किंमती २,००,००० /— रूपये असा एकुण किंमती ६,००,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला.

**सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १३/०५/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मुसेवाडी रामटेक रोड येथे नाकाबंदी केली असता लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम एच ३६/ झेड ६४१४ व विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॅालीसह मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक स्वप्नील गंगाधर मेहरकुडे, रा. सोनेघाट, ता. भोंदेवाडा रामटेक, जि. नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रॅक्टर क्र. एम एच ३६/ झेड ६४१४ व विना क्रमांकाची लाल रंगाची ट्रॉलीसह किमती ९,००,००० /—रूपये व २) १.५ ब्रास रेती किंमती १०,५००/— रूपये आणि असा एकुण ९,१०,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद वाहन आरोपी विरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## शेतात निष्काळजीपणाने आग लावल्याने कंपनीस आग लागून नुकसान, निष्काळजीपणाने शेतात आग लावणाऱ्यावर गुन्हा नोंद .

**पोलीस स्टेशन केळवद** :— पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील एम.आय.डी.सी. भागामधील “खाटुश्याम बायो कोल ब्रिकेट्स” या कंपनीत आग लागून आर्थिक नुकसान झाल्याची घटना घडली. सदर कंपनीमध्ये शेतीमधून निघणाऱ्या कापूस तुर, सोयाबीन अवशेष आदींपासून बायो कोल ब्रिकेट्स तयार करण्यात येतात. दिनांक ०५/०५/२०२६ रोजी दुपारी कंपनीजवळील शेतामध्ये शेतमालकाने धुरा जाळण्यासाठी आग लावली त्यानंतर शेतातून कंपनी परिसरात आग पसरल्याने कंपनीमध्ये साठवून ठेवलेल्या कच्च्या मालास तसेच मशिनरीस आग लागली. आगीमध्ये कंपनीचे ४० लाखाचे नुकसान झाले असुन सदर आगीत कोणतीही जिवीत हानी झाली नाही.

सदर प्रकरणी शेतमालक प्रकाश शेवके, रा. पहिलेपार, ता. सावनेर यांनी निष्काळजीपणे स्वत:च्या शेतात धुरा जाळण्यासाठी आग लावल्यामुळे ही घटना घडल्याने सदर प्रकरणी शेतमालक प्रकाश शेवके, रा. पहिलेपार यांच्यावर कलम ३२६ (फ), २२३ भान्यासं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे तरूणाचे मृत्यु नंतर शवविच्छेदन न केल्याचे बातमीबाबत..

दिनांक १४/०५/२०२६ चे एका वृत्तपत्रात २९ वर्षीय युवकाचा मृत्यु संशयाच्या भोवऱ्यात, भिवापुर ग्रामीण रूग्णालयातील प्रकार, शवविच्छेदन न करण्यामागचे कारण काय? अशा शिर्षकाखाली बातमी प्रसिध्द झाली आहे.

सदर बातमीबाबत सविस्तर माहीती याप्रकारे आहे की, दिनांक ३०/०४/२०२६ रोजी भिवापुर ग्रामीण रूग्णालयात इसम नामे अशीष रामटेके रा. भिवापुर याचा मृत्यु झाला. मा श्रीमती वृष्टी जैन, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, विभाग उमरेड यांनी सदर प्रकरणी भिवापुर ग्रामीण रूग्णालय येथे भेट देवुन सदर प्रकरणाची सविस्तर माहीती घेतली असाता सदरचा इसम हा दिनांक ३०/०४/२०२६ रोजी अंदाजे सकाळी ०९/०० वा चे दरम्यान त्याच्या मित्रासह उपचार घेणे करिता ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे आला होता. तसेच तो दारू पिण्याच्या सवीयीचा

होता अशी माहीती प्राप्त झाली. सदर इसम उपचारादरम्यान मरण पावला असुन त्याच्या शरीरावर कोणत्याही प्रकराच्या जखमा नव्हत्या किंवा मरणाबाबत कोणत्याही प्रकारची संशयास्पद परिस्थीत दिसुन आली नाही. वैदयकीय अधिकारी यांनी अशीष रामटेके याचा मृत्यू दारूच्या अतीसेवानामुळे त्याला हृदयविकाराचा झटका आल्याच्या कारणामुळे झाल्याची माहीती दिली. तसेच अशा प्रकाराच्या नैसर्गिक मृत्युनंतर कुटुंबाच्या मागणीनुसार शवविच्छेदन करण्यात येते अशी माहीती त्यांनी दिली. सदर मयत इसमाच्या कुटुंबाला त्याच्या मरणाबाबत कोणाताही संशय नसल्याने त्यांनी सदर मयाताचे शवविच्छेदन करायचे नसल्याबाबत विनंती लेखी स्वरूपात वैदयकीय अधिकारी यांना दिली. **श्रीमती वृष्टी जैन यांनी मयाताच्या कुटुंबाची विचारपुस केली असता त्यांनी मयताच्या मृत्यु बद्दल कोणताही संशय नसल्याचे तसेच कोणा विरूध्द कहीएक तक्रार नसल्याचे सांगितले. .**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये २० गुन्हे नोंद

दिनांक १३/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** अंतर्गत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन रामटेक** अंतर्गत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार** अंतर्गत १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत २ गुन्हे नोंद.**पोलीस स्टेशन खापा** १ गुन्हा नोंद.**पोलीस स्टेशन सावनेर** अंतर्गत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करणाऱ्यांवर ४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन पाचगाव** अंतर्गत १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद . **पोलीस स्टेशन बोरी** अंतर्गत १ गुन्हा **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत सिध्दार्थ कचरुजी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करणाऱ्यांवर १ गुन्हा नोंद . नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २० गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०६ गुन्हे नोंद. एकुण ३५७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ३,५७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे संजय रामप्रतापसिग ठाकुर, वय ५० वर्ष, रा. पटेल नगर, पिपरी कन्हान याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे कृष्णा बापुराव बोरकर, वय ५४ वर्षे, रा. पिपळा केवळराम, तह नरखेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे प्रमोद शंकररावजी तुमसरे, रा. महेन्द्री ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे नरेंद्र गजानन कर्णे, वय ३८ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे समीर सूधाकर वनकर, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र ०१, बेला ता. उमरेड, जि. नागपूर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे भारत वसंता कामीडवार, वय ३४ वर्ष, राहणार जुनी वस्ती वार्ड क्र. १, बुट्टीबोरी तालुका जिल्हा नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा ०६ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०६ गुन्हे दाखल केले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, कुही पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १३/०५/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ मौजा साळवा चापेगळी फाटा येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान मोटरसायकल क्र. एम. एच. ४० बी टी ४३३८ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) नत्थु हनुमान गायधने, वय ४३ वर्ष, रा. बोरी(नाईक) ता. कुही जि. नागपूर २) संजय अकाडु उईके, वय ४० वर्ष, रा. चापेगडी, ता. कुही, जि. नागपुर हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १४४ निपा किंमती ८३२०/— रूपये, मोटरसायकल क्र. एम. एच. ४० बी टी ४३३८ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५८,३२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी १) नत्थु हनुमान गायधने, वय ४३ वर्ष, रा. बोरी(नाईक) ता. कुही जि. नागपूर २) संजय अकाडु उईके, वय ४० वर्ष, रा. चापेगडी, ता. कुही, जि. नागपुर यांचेविरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १३/०५/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ विनय टाकीज रोड उमरेड येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान विना क्रमांकाची ॲक्टीव्हा गाडी ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी**

**नामे वंश सुखदेव तांबे, वय २४ वर्ष, रा. तारणा कुही हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या १८ निपा किंमती १६२०/— रूपये, विना क्रमांकाची ॲक्टीव्हा गाडी किंमती ६०,०००/—रू असा एकुण किंमती ६१,६२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी वंश सुखदेव तांबे, वय २४ वर्ष, रा. तारणा कुही यांचेविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३२ गुन्हे नोंद

दिनांक १३/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू व दुचाकी वाहन असा एकुण १,५२,७६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ३२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०८ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा** येथे ३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन वडोदा** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे १ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण ११७ लिटर मोहाफुल गावठी दारू, ६०४८० मिली देशी दारू तसेच वाहन, ४३२० मिली विदेशी दारू असा एकुण १,५२,७६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने